MHNG150024252022

**सं.फौ.ख.क्र. १६०२/२०२२**
**शासन वि. जसपालसिंग रिन**
**नि.क्र. ७ क्रमशः**

## <u>न्यायनिर्णय</u>

**( दिनांक ०५ सप्टेंबर, २०२३)**

१} **आरोपी नावे जयपालसिंग गूरुबचनसिंग रिन, वय–६० वर्ष, रा.–प्लॉट नं.१०४, गवसी मानापूर, पिरॅमिड सिटी, सी बिल्डींग, जिल्हा–नागपूर** यांचा गून्हा सिद्ध होण्याकरीता खालील मूद्दे उपस्थित होतात. त्याकरीताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुद्ध पुरावा नसल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

| | <u>मूद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १ | दिनांक १८–०६–२०२२ मौजा गूरमित ढाबा, डोंगरगाव हायवे रिंगरोड, पांजरी टोलनाक्याजवळ, तह–हिंगणा, जिल्हा–नागपूर येथे आरोपीने त्याच्या ढाब्यामध्ये अवैद्यरित्या ग्राहकांना दारु पिण्यासाठी जागा व सर्व सूखसोयी उपलब्ध करुन दिल्या तसेच आरोपीच्या ताब्यातून विदेशी दारुची सिंगनिचर कंपनीची ३७५ एमएलच्या काचेच्या बॉटलमध्ये काही दारु अर्धवट भरलेली तसेच विदेशी दारुची ओल्ड मग कंपनीची ३७५ एमएलच्या काचेच्या बॉटलमध्ये काही दारु अर्धवट भरलेली जप्त केली होती, हे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय? | **नाही** |
| २ | आदेश | **आरोपीची निर्दोष मूक्तता करण्यात आली.** |

## कारणमिमांसा

**मूद्या क्र.१ करीताः–**

२}  आरोपीचा गून्हा सिद्ध करण्याकरीता अभियोगपक्षाने एकच साक्षीदार तपासले. साक्षीदार क्र.१ **शरद लक्ष्मणराव खोकले** यांची साक्ष नि.क्र.७ मागेच नोंदविली असून ते पंच साक्षीदार आहेत. सदर पंच साक्षीदाराने अभियोगपक्षाला पुरेशी मदत केलेली नाही. त्यांनी त्यांच्या सरतपासनीत सांगीतले की, पोलीसांनी त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यासाठी बोलविले नव्हते. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याची कार्यवाही केली नव्हती. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष आरोपी कडून काहीही जप्त केले नसल्याचे सांगीतले. त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविला असता, त्यांनी पंचनाम्यावरील सही मान्य केली परंतू पंचनाम्यातील मजकूर त्यांना माहीत नसल्याचे सांगीतले. पूरेशी संधी देवून सूद्धा अभियोगपक्ष साक्षीदारांचा उलट तपास घेण्यास असमर्थ ठरले आहे. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात आरोपी विरोधी कूठलेही कथन आलेले नाही. त्यामूळे त्यांची साक्ष गृहीत धरण्यासारखी नाही. तसेच संधी देवून सूद्धा अभियोगपक्षाने तपासी अधिकारी यांचा पूरावा नोंदविला नाही. तसेच अभियोगपक्षाने जप्त मूद्येमालातील नमूना रासायनिक प्रयोगशाळा, नागपूर येथे घेवून जाणारे पोलीस कर्मचारी यांना तपासले नाही व जप्त केलेले द्रव्य दारु होती किंवा कसे, हे दर्शविणारा निर्णायक पूरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल न्यायालयासमोर अभियोगपक्षाने आणलेला नाही. त्यामूळे पंचनामा सिद्ध करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरले आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. याप्रमाणे आरोपीचा गून्हा सिद्ध होण्याकरीता आवश्यक असलेला पूरावा अभियोगपक्षाने न्यायालयासमोर आणला नाही. म्हणून मी मूद्या क्र.१ ला नकारार्थी उत्तर देतो.

**मूद्या क्र.२ करीताः–**

३}  वर चर्चा केल्याप्रमाणे आरोपी आरोपी सदर खटल्यातून निर्दोष मूक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता, तपासी अधिकारी यांनी ३७५ मि.ली. क्षमतेच्या दोन सिल तूटलेल्या सिंगनिचर व ओलड

मग कंपनीच्या विदेशी दारुच्या काचेच्या बॉटल ज्यामध्ये अर्धवट विदेशी दारु शिल्लक होती ती जप्त केल्याचे दिसते अपील कालावधीनंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शूल्क, नागपूर यांच्याकडे सदर द्रव्य मूद्येमाल नाशवंत असल्यामूळे त्याचा विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्याबाबतचे आदेश पारीत होणे मला योग्य वाटते. म्हणून मी मूद्या क्र.२ चे उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहीता कलम २५५ (१) अन्वये मूंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) नूसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मूक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जामीनबंधपत्र् रद्य करुन जामीनदाराला मूक्त करण्यात येते.

३. जप्त मूद्येमाल म्हणजे ३७५ मि.ली. क्षमतेच्या दोन सिल तूटलेल्या सिंगनिचर व ओल्ड मग कंपनीच्या विदेशी दारुच्या काचेच्या बॉटल ज्यामध्ये अर्धवट विदेशी दारु शिल्लक होती ती नाशवंत असल्याने अपील कालावधीनंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शूल्क, नागपूर यांच्याकडे विल्हेवाट लावण्याकरीता पाठवावे.

४. आरोपीने कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये अपील न्यायालयासमोर हजर राहण्याबाबत बंधपत्र् देण्यात यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर).**

AL AMOODI ABDUL KHAYYUM

Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2023.09.06 17:07:27 +0530

दिनांक ०५–०९–२०२३

(अल अमूदी ए.के.)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, हिंगणा

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file of order are word to word, as per original order.
Name of Stenographer : Megha R. Manmode

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | ०६.०५.२०२३ |
| Order dictated on | : | ०६.०५.२०२३ |
| Transcription ready on | : | ०६.०५.२०२३ |
| Order checked and signed on | : | ०६.०५.२०२३ |
| Path | : | /home/ubuntu/Desktop/Al Amoodi A.K. C.J. J.D. & JMFC, Hingna as on 01-09-2021/Year-2023 (copy)/Judgment/September-2023 (copy)/65-E Prohibition Act/Godrej Marathi Judgment SCC No. 1602-2022 State Vs.Jaspalsingh Rin (Videshi Daru 68-K) 68-K One Witness Hostile Dt 05-09-2023.odt |